दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २६८ वा | मंगळवार दि ०६ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

ट्रिपल सीटने केला आयुष्याचा शेवट, भीषण अपघातात तीन जीवलग मित्रांचा एकत्र अंत, बुलढाणा हळहळलं...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात एकापाठोपाठ एक जणू काही अपघाताची स्पर्धाच लागली आहे का, ही विचारण्याची वेळ आली आहे. आज ५ जानेवारी रोजी साधारणत: संध्याकाळी चार ते पाच वाजेच्या दरम्यान दुपारी बुलढाण्यात एक मोठी दुर्घटना घडली. ती देखील दुचाकी आणि एसटी बसमध्ये, हा अपघात इतका भयानक होता की सर्व काही स्तब्ध होऊन गेले. मुख्य म्हणजे या अपघातात मृतांच्या शरीराचे अक्षरश: तुकडे झाले आहेत. या अपघाताने बुलढाणा हादरुन गेले आहे.बुलढाण्यात दिवसागणिक अपघातात वाढ होत असून आज दुपारी एक भीषण अपघात होऊन ट्रिपल सीट सुसाट वेग असलेल्या बाईकस्वारांना जीव गमवावा लागला आहे. छत्रपती संभाजीनगरकडून धाडकडे जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसखाली चिरडले गेल्याने या तिघांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ५ जानेवारीला संध्याकाळी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान करडीच्या (धाड) पुलावर घडली. अपघात इतका भीषण होता की, यातील एकाच्या डोक्याची कवटी फुटून त्यांच्या मेंदूचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.मलकापूर आगाराची बस क्रमांक एमएच - ०६ - बीडब्ल्यू - ३६३८ क्रमांकाची एसटी बस छत्रपती संभाजीनगरवरुन मलकापूरला जात होती. तर ढाल

सावंगी तालुका बुलढाणा येथील अंकुश पाडळे, रवी चंदनशे आणि कैलास शिंदे हे तिघे मित्र मोटारसायकलवर स्वार होऊन धाडवरून कराडीच्या दिशेने जात होते. सदर बस सायंकाळी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान करडी (धाड) येथील पुलावर येताच या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. दुचाकी ही बसखाली अडकली आणि फरफटत गेली. यामध्ये दुचाकीस्वारांना गंभीर मार लागून त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. हा अपघात इतका भयंकर होता की, यातील एकाच्या डोक्याची कवटी फुटून त्याचा मेंदू बाहेर पडला. या दुर्दैवी घटनेमुळे ढालसावंगी गावावर दु:खाची लाट पसरली. घटनास्थळी नागरिकांनी या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरल्यानंतर परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती

फायनान्स कंपनीच्या रोखपालाकडून ९.०४ लाखांचा अपहार!

जनसंचलन/ नांदुरा

येथील भारत फायनान्समधील रोखपालाने एकूण ९ लाख ४ हजार रुपयांचा अपहार केल्याची घटना २४ ते ३१ डिसेंबरदरम्यान घडल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी भारत फायनान्स शाखेचे डीएमबीओ नितेश लहानू खोब्रागडे यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात ४ जानेवारी रोजी तक्रार दाखल केली आहे. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, सचिन ज्ञानेश्वर कोल्हे (रा. करवंड, ता. चिखली) हा भारत फायनान्स शाखेत रोखपाल पदावर कार्यरत आहे. त्याने स्टेट बँक ऑफ इंडिया येथे भरणा करण्यासाठी नेलेली ४ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम बँकेत जमा न करता स्वतःकडेच ठेवली. यानंतर भारत फायनान्स शाखेचे व्यवस्थापक संदीप नागपुरे यांच्या स्टेट बैंक ऑफ इंडियाच्या चेकवर खोटी सही करून ४ लाख ३० हजार रुपये काढल्याचा आरोप आहे. याशिवाय, स्थानिक भीमनगर येथील खातेधारक सुनीता घनमोडे यांच्याकडून विड्रॉल रजिस्टरवर व मशीनवर अंगठा घेऊन १४ हजार रुपये काढून तेही स्वतः कडेच ठेवल्याचे तक्रारीत नमूद आहे. शाखेत सध्या रोख रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगून संबंधित खातेदाराला तीन-चार दिवसांनी रक्कम घेण्यास सांगण्यात आले होते. या प्रकारे

आरोपी रोखपालाने एकूण ९ लाख ४ हजार रुपयांचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (४), ३१८ (४), ३३६(२) व ३३६ (३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक नितीन चव्हाण करीत आहेत

डम्पिंग ग्राउंडवरील कचरा पेटविल्याने ग्रामस्थ आक्रमक...

जनसंचलन/मलकापूर

बेलाड शिवारातील डम्पिंग ग्राउंडवर साठविण्यात आलेला घनकचरा पेटविल्यावरून सोमवार, ५ जानेवारी रोजी सकाळी ग्रामस्थ आक्रमक झाले. संतप्त नागरिकांनी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना जाब विचारल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर दुपारी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासोबत पालिका प्रशासनाची चर्चा झाली असून, त्यातून तात्पुरता तोडगा काढण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मलकापूर नगरपालिकेच्या अखत्यारीतील संकलित घनकचरा बेलाड शिवारातील डम्पिंग ग्राउंडवर साठविला जातो. सोमवारी सकाळी सुमारे १० वाजता घनकचरा घेऊन आलेल्या घंटागाड्या डम्पिंग ग्राउंडवर दाखल झाल्या. त्याच वेळी बेलाड येथील मोठ्या संख्येने ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. त्यांनी कचरा खाली करण्यास मज्जाव करीत तीव्र संताप व्यक्त केला.

संचालकांबाबतची संदिग्धता

बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे. कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.

बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? पूर्ण वेळ संचालकफ ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ङ्गसलगफया शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत ङ्गसलगफशब्दाऐवजी ङ्गएकूणफ असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली! केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती. १) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

कार्यसम्राट नाही, करप्शन सम्राट! प्रचारसभेत शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

मुंबई : 'कोणी माईचा लाल आला तरी कुणाच्याही सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ शकत नाही. आता भावनेचं राजकारण संपलंय, मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नको तर विकासाचे वारकरी हवेत,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर शेलक्या भाषेत टीकास्त्र सोडले. मुंबईतील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिंदेंनी ठाकरेंच्या 'करून दाखवलं' या घोषणेचा समाचार घेत त्यांना 'करप्शन सम्राट' म्हणत त्यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ते आज वरळीतल्या महायुतीच्या पहिल्या प्रचारसभेत बोलत होते.भावनेवर तुम्हाला आता निवडणुका जिंकता येणार नाही. तुम्हाला लोकांना विकास करून दाखवावा लागेल. मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नकोत, मुंबईकरांना विकासाचे वारकरी पाहिजेत, आता बदलली आहे परिस्थिती. मुंबईकर जनता सुज्ञ आहे. दिवसभर नेटफक्स आणि निवडणुका आल्या की पॉलिटिक्स तो गेला जमाना आता. ज्यांनी मुंबईची वाट लावली अशा लोकांच्या हातात मुंबई देणार? कधीच मिळणार नाही. एवढे वर्ष मुंबईत यांची सत्ता होती, तरी सुद्धा मराठी माणूस वसई- विरार नाला सोपारा इकडे अंबरनाथ बदलापूरकडे का फेकला गेला? याच उत्तर द्या.' असं शिंदे म्हणाले.मराठी माणूस मुंबईतून हद्दपार का झाला? कुणामुळे मुळे झाला? याला जबाबदार कोण? याचं उत्तर द्या. मुंबईच्या मेट्रो प्रकल्पात खो कोणी घातला? याचं उत्तर द्या. मुंबईची लाईफलाईन असलेल्या बेस्टच वाटोळ कोणी केलं? कोविड रुग्णांच्या तोंडातली खिचडी कोणी खाल्ली? बॉडी बॅग मध्ये पैसे बनवण्याच पाप कोणी केलं? गरीब मुंबईकरांच्या घराच स्वप्न धुळीला कोणी मिळवलं? मुंबईत मोक्याचे भूखंड धनदांडग्यांच्या घशात कोणी घातले? गिरणी कामगारांच्या तोंडाला पानं कोणी पुसली? बीडीडी चाळीतल्या रहिवाशांचे हाल कोणी केले? पत्रा चाळीतल्या लोकांना देशोधडीला कोणी लावलं?', अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर एकच हल्लाबोल केला आहे. यावेळी पुढे ते म्हणाले की, नंतर आपण (महायुती) घर बीडीडी चाळीतल्या लोकांना घर दिली.यावेळी शिंदेंनी ठाकरेंच्या करुन दाखवलं या जाहिरातीतील घोषणेवर म्हणाले की, 'यांनी कचऱ्यात करप्शन करून दाखवलं, गटारात करप्शन करून दाखवलं, डांबरात करप्शन करून दाखवलं, खिचडीत करप्शन करून दाखवलं, मिठी नदीच्या गाळात करप्शन करून दाखवलं. आम्ही करून दाखवलं म्हणातात हे कार्यसम्राट आहेत? मी म्हणेन हे करप्शन सम्राट आहेत. किती खाणार?

एबी फॉर्म'ची चोरी ; केळुसकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

मुंबई : भारतीय जनता पक्षाच्या वसंत स्मृती कार्यालयातून एबी फॉर्म चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. शीव येथील प्रभाग क्रमांक १७३मधून निवडणूक रिंगणात उतरलेल्या शिल्पा केळुसकर यांच्यावर फॉर्म चोरी केल्याचा आरोप आहे. भाजपच्या वतीने करण्यात आलेल्या तक्रारीवरून शीव पोलिस ठाण्यात केळुसकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी हा गुन्हा भोईवाडा पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपच्या वसंत स्मृती येथील कार्यालय सचिव दिनेश जगताप यांनी याबाबत तक्रार केली आहे. महापालिका निवडणुकीसाठी शीव प्रतीक्षानगर येथील प्रभाग क्रमांक १७३मधून भाजपच्या वतीने शिल्पा केळुसकर यांना उमेदवारी देण्यात आली. २९ डिसेंबर रोजी त्यांना कार्यालयात बोलावून पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म देण्यात आला. मात्र शिवसेना आणि भाजपच्या बैठकीत ही जागा शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने या प्रभागातून पूजा कांबळे यांना उमेदवारी देण्यात आली. यानंतर शिल्पा यांना पक्षाच्या वतीने दिलेला एबी फॉर्म पुन्हा कार्यालयात जमा करण्यास सांगण्यात आले. २९ डिसेंबरच्या सायंकाळी त्यांनी कार्यालयात एबी फॉर्म आणून दिला.

जगताप यांनी आपल्या कपाटामध्ये हा अर्ज ठेवला होता.शिवसेनेच्या उमेदवार पूजा कांबळे यांच्या पतीने शिल्पा यांनी भाजपच्या एबी फॉर्मवर उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती कार्यालयात दिली. हा एबी फॉर्म त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर जगताप यांनी तपासले असता, त्यांच्या कपाटामधील फॉर्म गायब होता. यावरून शिल्पा यांनीच किंवा त्यांच्या वतीने अन्य कुणीतरी हा फॉर्म चोरल्याचा संशय बळावला. त्यावरून जगताप यांनी शीव पोलिस ठाण्यात तक्रार केली.याप्रकरणी शिल्पा केळुसकर यांना नोटीस पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आल्याचेही त्याने सांगितले.

भाजप विरूद्ध राष्ट्रवादी, बंडखोरांची चिन्हे समोर

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची माघारी आणि चिन्ह वाटप यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यानुसार मुख्य लढत भारतीय जनता पक्ष विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रंगण्याची चिन्हे आहेत. महापालिकेच्या १२८ जागांसाठी एकूण एक हजार १३५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ४४३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यामुळे निवडणूक रिंगणात ६९२ उमेदवार आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्षासह राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी आदी राष्ट्रीय व राज्य पातळीवरील नोंदणीकृत पक्षांचा समावेश आहे. भाजपचे रवी लांडगे आणि सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध र निवड झाली आहे. त्यामुळे १२६ जागांसाठी ६९० उमेदवार रिंगणात असल्याचे स्पष्ट झाले.उमेदवारी अर्ज माघारीनंतर शनिवारी (तीन जानेवारी) दुपारपर्यंत उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले. त्यामध्ये पक्षाचे एबी फॉर्म न असलेल्यांना पक्षाचे चिन्ह मिळाले आहे.

बिनविरोध निवडून आलेल्यांची धाकधूक वाढली, आयोगाकडून कोणते नवे आदेश?

मुंबई : मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे ६० हून अधिक उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या निवडून आलेल्या उमेदवारांबाबत राज्य निवडणूक आयोगाने संबंधित महापालिका आयुक्तांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. हा अहवाल येईपर्यंत विजयी उमेदवार जाहीर करू नका, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत.सन २००४ च्या राज्य निवडणूक आयोगाच्या स्थायी आदेशानुसार ज्या ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, त्याबाबतचा अहवाल आयोगाला सादर करावा लागतो. त्यानुसार संबंधित महापालिका आयुक्तांना अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. यात चौकशीचा प्रश्न नाही,' असे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी शनिवारी सांगितले. 'एखादा उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला राज्य निवडणूक आयोगाला अहवाल सादर करावा लागतो. अहवाल देण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने बिनविरोध निवडीबाबत प्रक्रिया पार पाडली किंवा संबंधित उमेदवाराला निवडून आल्याचे प्रमाणपत्र दिले असेल, तर नियमानुसार कारवाई केली जाईल,' असं एका अधिकाऱ्यानं स्पष्ट केलं. राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचे अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याबद्दल राजकीय वतुर्ळात सर्वत्र चर्चेचा विषय ठरला असतानाच याविरोधात आता विरोधकांनी आक्रमक पवित्रा धारण केला आहे. याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना न्यायालयात जाणार आहे, असे पक्षाचे नेते अविनाश जाधव यांनी शनिवारी सांगितले.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेतेमंडळींची विशेष बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली होती.

महापौर हिंदू-मराठी होणार, फडणवीसांची घोषणा ; ठाकरे बंधूंचा हल्लाबोल

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबईतील शिवसेना भवन इथं मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी ठाकरे बंधूंनी सत्ताधारी महायुतीचा जोरदार समाचार घेतला. मुंबईचा महापौर हिंदू-मराठी होईल, अशी घोषणा नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. यावर बोलताना राज ठाकरेंनी आपल्या नेहमीच्या शैलीत फडणवीसांवर पलटवार केला. राज ठाकरे म्हणाले की, 'पेशव्यांच्या राजवटीत तीन संस्थानं उभी राहिली. एक म्हणजे गुजरातमधील गायकवाडांचं, दुसरं सिंधिया यांचं आणि तिसरं होळकरांचं. बडोद्याचं साम्राज्य हे मराठेशाहीचं साम्राज्य उभं राहिलं होतं. मग त्या बडोद्यात सगळे महापौर गुजरातीच का होतात? हा महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्रातील प्रत्येक शहरातील महापौर हा मराठीच होणार. इथं कसलं हिंदू-मराठी करताय तुम्ही? आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात तुम्ही मराठीचा मान हा राखलाच पाहिजे. त्यामुळे आमचा जो महापौर होईल, तो मराठीच होणार, मुंबईचा महापौर मराठीच होणार,' असा पुनरुच्चार

राज ठाकरे यांनी केला.'मी खूप वर्षांनंतर आज शिवसेना भवनात आलो आहे. नवीन शिवसेना भवन मी पहिल्यांदाच बघतोय. माझ्या मनात शिवसेना भवनाच्या सर्व जुन्या आठवणी आहेत. त्या आठवणी रोमांचकारी, आनंददायी होत्या. मी त्याबद्दल बोलायला लागलो, तर मला अनेक आठवणी सांगता येतील. १९७७ साली शिवसेना भवन झाले. तेव्हापासूनच्या सर्व आठवणी आहेत,' असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. तसंच आज शिवशाहीचा-शिवशक्तीचा संयुक्त जाहीरनामा शिवसेना-मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांचा एकत्रित जाहीरनामा आम्ही आज प्रकाशित करत आहोत, असंही ते म्हणाले.आम्ही एकत्र येतोय तर आनंद आहे, संपूर्ण महाराष्ट्रात नवचैतन्य सळसळतं आहे. आज शिवशक्तीचा वचननामा आम्ही जनतेच्या चरणी सादर करतोय. शिवसेना-मनसे आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा हा वचननामा आहे. जी झुंडशाही सुरू झालीय, आम्ही त्यांची मतचोरी पकडली, ही चोरी पकडल्यानंतर त्यांनी आता आमच्या उमेदवारांची पळवापळवी सुरू केलीय. बिनविरोध निवडणूक करण्याची जी पद्धत सुरूय तो लोकशाही आणि जनतेचा अपमान आहे. राहुल नार्वेकर यांनी काल-परवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करत जनतेवर दमदाटी करताना दिसले. अशा विधानसभा अध्यक्षांना निवडणूक आयोगाने तत्काळ निलंबित केलं पाहिजे,' अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली आहे.

निवृत्तीचं स्वप्न डोळ्यांत होतं, पण काळानं वाटेतच गाठलं; खेडच्या पोस्टमास्तरांचा करुण अंत

रत्नागिरी : मुंबई गोवा महामार्गावर यापूर्वी अनेकदा अपघात झाले आहेत यामध्ये अनेकांना जीव गमावे लागले आहेत. असाच एक भीषण अपघात खेड तालुक्यात कळंबणी येथे झाला होता या अपघात जखमी झालेल्या ६३ वर्षीय वृद्ध इसमाचा उपचारादरम्यान दुर्दैवीरीत्या मृत्यू झाला आहे. रामचंद्र बाबू गुरव (६४, रा. कळंबणी बुद्रुक) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.रामचंद्र गुरव हे पोस्टात कामाला होते. ते पोस्टमास्तर होते त्यांच्या रिटायरमेंटला अवघे केवळ १३ महिने महिने राहिले होते अशातच त्यांचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाला आहे. पोस्टाच्याच कामासाठी निघालेले असतानाच त्यांचा चार दिवसांपूर्वी अपघात झाला होता. कळंबणी येथून खेड भरणे दिशेने जात असताना पाठीमागून येणाऱ्या कारने (एमएच ४३ बीवाय ७५१२) त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने मोठा अपघात झाला. त्यात ते गंभीरित्या जखमी झाले होते. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं त्यांच्यावर उपचार सुरू होते या उपचार दरम्यानच त्यांची आज प्राणज्योत मालवली. अपघातानंतर ते गेले चार दिवस बेशुद्ध अवस्थेत होते त्यांच्यावर उपचार सुरू होते.खेड तालुक्यातील कळंबणी बुद्रुक गावचे पोस्ट मास्तर व गावातील देवस्थानचे पुजारी तसेच खजिनदार या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या रामचंद्र गुरव

यांच्याकडे होत्या. कळंबणी बुद्रुक येथे अंत्यविधी दुपारी ठीक दोन वाजता करण्यात आले. त्यांच्या निधनाने गाव परिसरावर व गुरव कुटुंबीयांवर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली,मुलगा,सून,भाऊ,भावजय असं एकत्र कुटुंब आहे.

या अपघातप्रकरणी चिपळूण तालुक्यातील खेर्डी परिसरातील असलेल्या कार चालकावर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामचंद्र गुरव हे दुचाकीवरून कळंबणी येथून भरणे दिशेने जात असताना पाठीमागून येणाऱ्या कारने (एमएच ४३ बीवाय ७५१२) त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

या अपघातात गुरव यांच्या डोक्यासह पायाला गंभीर दुखापत झाली असून दुचाकीचेही नुकसान झाले होते. या अपघात प्रकरणाचा तपास खेड पोलीस करत आहेत.

एकाच कापडी दोरीने बाप-लेकाने आयुष्य संपवलं, जामखेड हादरलं

जामखेड : जामखेड शहरात अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. एकाच कापडी दोरीने बाप-लेकाने गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केल्याने संपूर्ण शहर हादरले आहे. नव्या कोर्ट परिसरातील शेतात ही दुर्दैवी घटना उघडकीस आली असून, घटनेने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मयत बाप-लेकांची नावे कानिफ ज्ञानदेव पवार (वय ४५) आणि सचित कानिफ पवार (वय १६, देघेही रा. आरोळे वस्ती, जामखेड) अशी आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन-तीन दिवसांपूर्वी पत्नी माहेरी गेल्यानंतर घरात तणाव निर्माण झाला होता. शुक्रवार, २ जानेवारी २०२६ रोजी रात्री घरगुती कारणावरून बाप-लेकांमध्ये मोठा वाद झाला. त्यानंतर सचित घराबाहेर निघून गेला. वडिलांनी रात्रभर आणि पहाटेपर्यंत मुलाचा शोध घेतला; मात्र तो कुठेही सापडला नाही.पहाटे नवीन कोर्ट रोड म्हाडा कॉलनीजवळील शेतात झाडाला सचितने मॅटच्या कापडाने

गळफास घेतल्याचे वडिलांच्या निदर्शनास आले. हा धक्का सहन न झाल्याने वडिलांनी मुलाचा मृतदेह खाली उतरवला आणि त्याच कापडाने स्वतःही गळफास घेऊन जीवन संपवले. ही घटना पाहून उपस्थितांच्या काळजात धस्स झाले.या घटनेची माहिती समजतात नगरसेवक व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती मिळताच नगरसेवक महेश निमोणकर आणि संतोष गव्हाळे यांनी धाव घेतली. उपनिरीक्षक शिवाजी कदम आणि सचिन देवडे घटनास्थळी दाखल झाले. सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या मदतीने संजय कोठारी व दीपक भोरे यांनी रुग्णवाहिकेतून मृतदेह जामखेड ग्रामीण रुग्णालयात हलवले.

रस्त्याच्या मधोमध गर्लफ्रेंडला संपवलं

बंगळुरु : लग्न करण्यास नकार दिल्याने एका तरुणाने आपल्या गर्लफ्रेंडची निर्घृण हत्या केली आणि त्यानंतर तो पळून गेला. पोलिसांनी सांगितले की, आरोपीचं मृत महिलेवर प्रेम होतं, पण ती लग्न करण्यास नकार देत होती, त्यामुळे त्याने प्रेयसीची हत्या केली. उत्तर कन्नड जिल्ह्यातील येल्लापूर येथे ही धक्कादायक घटना घडली आहे. गेल्या शनिवारी येल्लापूर पोलिस ठाण्यातील हद्दीत ही घटना घडली. सध्या पोलिस फरार आरोपीचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिला रंजिता येल्लापूर शहरातील रहिवासी होती. रफिक नावाचा एक तरुण गेल्या काही वर्षांपासून रंजितावर प्रेम करत होता. रंजिताचा सुमारे दहा वर्षांपूर्वी घटस्फोट झाला होता आणि तिला एक मूल होते. रंजिता तिच्या आईवडिलांसोबत आणि मोठ्या भावासोबत येल्लापूरमध्ये राहत होती आणि एका सरकारी शाळेत जेवण बनवण्याचे काम करत होती.घटस्फोटानंतर काही महिन्यांनी रफिक आणि रंजिता यांची ओळख झाली आणि ते एकमेकांवर प्रेम करु लागले होते.

मोबाइलचं नेटवर्क शोधताना तोल गेला, १७ व्या मजल्यावरुन पडले

नोएडा : नोएडाच्या सेक्टर १०४ मधील एका सोसायटीच्या उंच इमारतीत एक दुर्दैवी अपघात घडला आहे. शनिवारी सकाळी येथे इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक अजय गर्ग (५५) यांचा १७ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सोसायटीत एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. नोएडापोलिसांच्या प्राथमिक तपासात असं दिसून आलं आहे की, सकाळी १०:२० वाजता अजय गर्ग आपल्या पत्नीशी बोलत होते. त्यानंतर ते फोन करण्यासाठी बाल्कनीत गेले. त्यांच्या फ्लॅटमध्ये नेटवर्क नसल्याने ते बाहेर गेले. अचानक त्यांचा तोल गेला आणि ते खाली पडले. सोसायटीतील रहिवाशांनी त्याला जमिनीवर पडलेले पाहिले आणि त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.अजय गर्ग इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या दिल्ली कार्यालयात कार्यकारी संचालक होते. ते मूळचे उत्तर प्रदेशातील कानपूरचे होते. अजय गर्ग हे त्यांची पत्नी मयुरी गर्ग यांच्यासोबत नोएडाच्या एटीएस

वन हॅम्लेट सोसायटीमध्ये राहत होते. त्यांना एक मुलगा आहे जो मुंबईत काम करतो.

पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला आहे आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, हा अपघात होता की त्यांनी आपल्या आयुष्याची अखेर केली हे तपासानंतरच स्पष्ट होईल. घटनास्थळी कोणतीही सुसाईड नोट सापडलेली नाही. पोलीस सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत आणि कुटुंबातील सदस्यांची आणि समाजातील सदस्यांची चौकशी करत आहेत.घटनेनंतर कुटुंबात एकच शोककळा पसरली आहे. अजय गर्ग यांच्या मुलाला माहिती देण्यात आली आहे.

डॉक्टरांकडे नेले, मारले तरी ऐकत नव्हता ; शेवटचा पर्याय म्हणून १२ वर्षीय मुलाला थेट साखळदंडाने बांधले

नागपूर : नागपूरमधून माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. आर्थिक परिस्थिती आणि शिस्तीच्या नावाखाली एका दाम्पत्याने आपल्या अवघ्या १२ वर्षांच्या मुलाला तब्बल तीन ते चार महिन्यांपासून साखळदंडाने बांधून ठेवल्याचा अमानुष प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून पालकत्व, बालहक्क आणि सामाजिक संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेतपीडित मुलाचे आई-वडील मोलमजुरीचे काम करतात. उदरनिर्वाहासाठी दोघांनाही दिवसभर घराबाहेर राहावे लागत असल्याने घरात कोणी नसते. या काळात मुलाचे वर्तन बिघडत चालल्याचा दावा पालकांनी केला

आहे. मुलाला चोरीची सवय लागली होती, तो घराबाहेर जाऊन मोबाईल, सायकलसारख्या वस्तू उचलून आणत असे. तसेच तो आपल्या भावालाही सोबत घेऊन जात असल्याचे आईने सांगितले.या प्रकरणावर पीडित मुलाच्या आईने प्रतिक्रिया देताना धक्कादायक कबुली दिली आहे. परिसरातील नागरिकांकडून आमच्याकडे वारंवार तक्रारी येत होत्या. आम्ही त्याला अनेकदा समजावून सांगितले, मारूनही पाहिले, पण तो काही ऐकत नव्हता. आम्ही त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेलो, मात्र तो तिथूनही पळून जायचा, असे आईने सांगितले. या सगळ्या परिस्थितीला कंटाळून आणि मुलगा कुठे बाहेर जाऊन चुकीचे कृत्य करू नये, या हेतूने आम्ही त्याला साखळदंडाने बांधून ठेवण्याचा निर्णय घेतल्याची कबुली आई-वडिलांनी दिली आहे. आणि आम्ही त्याला दिवसातून फक्त दोन तास बांधून ठेवत असल्याचे त्याचा आई ने सांगितले.मात्र, तज्ज्ञांच्या मते हा प्रकार अत्यंत गंभीर आणि अमानवी आहे. कोणत्याही परिस्थितीत मुलावर अशी वागणूक योग्य ठरू शकत नाही. मुलाचे वर्तन समस्यात्मक असले तरी त्यावर समुपदेशन, वैद्यकीय उपचार, शाळा प्रशासन किंवा बालकल्याण यंत्रणांची मदत घेणे आवश्यक होते. शारीरिक बंधन आणि मानसिक छळ केल्याने मुलाच्या मानसिक आरोग्यावर दीर्घकालीन आणि गंभीर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बालकल्याण समितीने तातडीने दखल घेतली आहे. मुलाला सुरक्षित ठिकाणी हलवून त्याचे समुपदेशन तसेच वैद्यकीय तपासणी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, पालकांविरोधात कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता असून चौकशी सुरू आहे.

टी-२० वर्ल्डकपपूर्वी नवीन ड्रामा, बांगलादेश क्रिकेटची अट, बीसीसीआयनेही दिलं उत्तर

मुंबई : आगामी T20 World CuP 2026 भारत आणि बांगलादेशमधील राजनैतिक तणाव आता क्रिकेट क्षेत्रातही पसरला आहे. बांगलादेशने अधिकृतपणे भारतात होणारे त्यांचे चार लीग सामने श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली आहे. आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाईट रायडर्सने अलीकडेच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या सूचनेनुसार बांगलादेशी वेगवान गोलंदाज Mustafizur Rahman सोडल्यानंतर ही मागणी करण्यात आली आहे. बांगलादेश सरकारचे सल्लागार आसिफ नजरल यांनी स्पष्ट केले आहे की त्यांनी बांगलादेश क्रिकेट बोर्डाला या संदर्भात आयसीसीला लेखी पत्र पाठवण्याचे निर्देश दिले आहेत. नजरल यांचा असा युक्तिवाद आहे की जर एखाद्या प्रमुख बांगलादेशी खेळाडूला कराराखाली असूनही भारतात सुरक्षित वाटत नसेल किंवा त्याला खेळण्यापासून रोखण्यात आले असेल, तर भारत दौऱ्यामुळे संपूर्ण राष्ट्रीय संघासाठी सुरक्षेची चिंता निर्माण होऊ शकते. केकेआरने ९.२० कोटींना खरेदी केलेल्या मुस्तफिजूर रहमानला राजकीय परिस्थितीचा

हवाला देत आयपीएलमधून काढून टाकण्यात आले. ज्यामुळे वाद आणखी वाढला आहे.बांगलादेशचे चार महत्त्वाचे लीग सामने भारतातील दोन प्रमुख शहरांमध्ये खेळवण्यात येणार आहेत. वेळापत्रकानुसार, बांगलादेश त्यांचे पहिले तीन सामने कोलकाता येथे ७ फेब्रुवारी रोजी वेस्ट इंडिज, ९ फेब्रुवारी रोजी इटली आणि १४ फेब्रुवारी रोजी इंग्लंड विरुद्ध खेळेल. त्यानंतर, १७ फेब्रुवारी रोजी नेपाळ विरुद्धचा त्यांचा शेवटचा साखळी सामना मुंबईत होणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव आणि सध्या सुरू असलेल्या तणावामुळे बांगलादेशला हे सर्व सामने श्रीलंकेत हलवायचे आहेत.

बीसीसीआयच्या सूत्रांनी बांगलादेशची मागणी पूर्णपणे चूकीची असल्याचे म्हटले आहे. बोर्डाचे म्हणणे आहे की, 'स्पर्धा सुरू होण्यास फक्त एक महिना शिल्लक असल्याने सामने स्थलांतरित करणे अवघड ठरेल. बीसीसीआयच्या मते, केवळ स्थळ बदलणे हे एक आव्हानच नाही तर विरोधी संघांचा प्रवास, हॉटेल बुकिंग, ब्रॉडकास्टिंग क्रू आणि सुरक्षा व्यवस्था इतक्या कमी वेळेत पुनर्रचना करणे जवळजवळ अशक्य आहे. बोर्डाने स्पष्ट केले आहे की एका देशाच्या इच्छेनुसार संपूर्ण स्पर्धेची रचना बदलता येणार नाही.

IPL मधून काढताच बांगलादेशचं मोठंपाऊल

मुंबई :केकेआरने मुस्तफिजर रहमानला संघातून वगळले. आता या निर्णयानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने मोठा निर्णय घेतला.बीसीसीआयने केकेआरला स्पष्ट केले की, 'बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रहमानला सोडावे लागेल आणि खझङ २०२६ काढून टाकावे लागेल.' केकेआरनेही त्याचे अनुकरण केले. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आता प्रत्युत्तर दिले आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि भारतात होणाऱ्या आगामी टी-२० विश्वचषकाबाबत एक निवेदन जारी केले. आसिफ नजरुल यांनी सोशल मीडियाद्वारे सांगितले की, 'बांगलादेश आता भारतात विश्वचषक खेळण्याच्या बाजूने नाही आणि कठोर पावले उचलली जात आहेत.'संपूर्ण वादाच्या मुळाशी बांगलादेशी स्टार गोलंदाज मुस्तफिजूर रहमान आहे. क्रीडामंत्र्यांचा आरोप आहे की, 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अतिरेकी आणि सांप्रदायिक गटांच्या दबावाखाली कोलकाता नाईट रायडर्सला

मुस्तफिजूर रहमानला त्यांच्या संघातून काढून टाकण्याचे निर्देश दिले. मंत्र्यांनी या निर्णयाचा तीव्र निषेध केला आणि तो खेळाच्या भावनेविरुद्ध असल्याचे म्हटले.'आसिफ नजरुल यांनी सांगितले की, 'त्यांनी बांगलादेश क्रिकेट बोर्डाला परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला पत्र लिहिण्याचे निर्देश दिले आहेत. बांगलादेश सरकारचा असा युक्तिवाद आहे की जर एखादा करारबद्ध खेळाडू भारतात सुरक्षित नसेल आणि दबावाखाली त्याला काढून टाकता आले तर संपूर्ण बांगलादेशी संघ विश्वचषकादरम्यान तेथे सुरक्षित वाटणार नाही.

गौतम गंभीर यांनी एका खेळाडूचं करीअर संपवलं, आता पुन्हा संधी नाहीच

नवी दिल्ली : न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर करण्यात आला. पण हा संघ जाहीर झाल्यावर भारताच्या एका खेळाडूचं करीअरच गौतम गंभीर यांनी संपवल्यातं आता समोर आलं आहे.भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन वनडे सामन्यांची मालिका होणार आहे. या मालिकेसाठी संघ निवडण्यासाठी बीसीसीआयची एक खास बैठक पार पडली. या बैठकीत वनडे वर्ल्ड कपच्या दृष्टीने संघात काही मोठे बदल करण्यात आले. पण हा संघ जाहीर करत असताना एका खेळाडूवर मात्र अन्याय केल्याचे समोर आले आहे. गौतम गंभीर यांनी ज्या खेळाडूला चांगली कामगिरी करूनही डावलले, त्याला पुन्हा एकदा संघाबाहेर करत त्याचे करीअर संपवल्याचे यावेळी पाहायला मिळाले. कारण हा कोणत्याही खेळाडूसाठी वनडे संघात येण्याची अखेरची संधी होती.

त्यानंतर थेट वर्ल्ड कपच्या दृष्टीने भारताचा संघ बांधला जाणार आहे. त्यामुळे यावेळी संधी मिळाली नाही, याचा अर्थ वर्ल्ड कप आणि त्यानंतरही संघात संधी मिळणार नाही, असा समजला जात आहे.भारताचा जेव्हा संघ निवडण्यात आला, तेव्हा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला वनडे वर्ल्ड कप डोळ्यासमोर ठेवून संघात स्थान देण्यात आले. पण त्याचवेळी भारताचा अनुभवी गोलंदाज मोहम्मद शमीचा पत्ता मात्र कायमचा कट केल्याचे यावेळी म्हटले जात आहे. मोहम्मद शमीने गेल्या वनडे वर्ल्ड कपमध्ये दमदार कामगिरी केली होती. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीही मोहम्मद शमीने गाजवली होती. मोहम्मद शमी त्यानंतरही चांगल्या फॉर्मात होता. बीसीसीआयच्या स्थानिक स्पर्धांमध्ये त्याने चमकदार काम गिरी केली. भारतीय संघात परतण्यासाठी त्याने सर्वतोपरी प्रयत्न केले. पण काही केल्या गौतम गंभीर यांनी त्याला भारतीय संघात पुन्हा परतण्याची संधीच दिली नाही. मोहम्मद शमी सध्याही चांगल्या फॉर्मात आहे, पण तरीही त्याची न्यूझीलंडच्या वनडे मालिकेसाठी निवड केली नाही. त्यामुळे आता मोहम्मद शमीला यापुढे भारताच्या संघात संधी मिळणार नसल्याचे म्हटले जात आहे.गौतम गंभीर यांनी एका खेळाडूचं करीअर संपवल्याचे आता समोर येत आहे. कारण आता या खेळाडूला कधीच भारतीय संघात संधी मिळणार नाही, असे म्हटले जात आहे.

वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वाखाली भारताचा दमदार विजय

नवी दिल्ली : वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वामध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेच्या संघावर दमदार विजय साकारला. भारताचा हा या दौऱ्यीतल पहिलाच सामना होता. या पहिल्या सामन्यात भारताने किती धावांनी विजय साकारला, हे आता समोर आलं आहे. भारताने या सामन्यात टॉस जिंकला आणि कर्णधार वैभव सूर्यवंशीने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशी भन्नाट फॉर्मात गेले काही दिवस होता. पण या सामन्यात मात्र त्याला चमक दाखवता आली नाही. भारताला पहिला धक्का आरोन जॉर्जच्या रुपात बसला, त्याला पाच धावा करता आल्या. वैभवकडून यावेळी मोठी अपेक्षा होती. पण वैबवला या सामन्यात ११ धावांवरच समाधान मानावे लागले. भारताचे एकामागून एक विकेट पडत गेले आणि त्यांनी ४ बाद ६७ अशी अवस्था झाली होती. यावेळी भारताचा संघ गडगडेल, असे वाटत होते. पण त्यावेळी भारताच्या मदतीसाठी हरवंश पांगलिया आणि आरएस अंब्रिश हे दोघे धावून आले. या दौघांनी पाचव्या विकेटसाठी १३७ धावांची भागीदारी रचली आणि संघाला दोनशे धावांचा महत्वाचा टप्पा गाठून दिला.हरवंशने यावेळी धमाकेदाज फटकेबाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले.हरवंश त्यानतर शतकाच्या दिशेने कूच करायला लागला, पण शतक पूर्ण करण्यात त्याला अपयश आले. हरवंशने या सामन्यात सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ९३ धावा केल्या, त्याचे शतक सात धावांनी हुकले. हरवंशला यावेळी अंब्रिशने चांगली साथ दिली, त्याने सात चौकारांच्या जोरावर ६५ धावा केल्या. अखेरच्या षटकांमध्ये खिलान पटेलने १२ चेंडूंत तीन षटकारांच्या जोरावर २६ धावा केल्या, त्यामुळे भारताला या सामन्यात तिनशे धावांचा पल्ला गाठता आला. भारताने या सामन्यात ३०१ धावांचा डोंगर उभारला.भारताच्या ३०२ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात चांगली झाली नाही. कारण त्यांची ३ बाद ६२ अशी अवस्था झाली होती. यजमानांचा सलामीवीर जोरिच व्हॅनने नाबाद ६० धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेची २७.४ षटकांत ४ बाद १४८ अशी धावसंख्या असताना पावसाचे आगमन झाले. पावसाचा जोर एवढा होता की, या सामन्याचा डकवर्थ लुईस नियमांनुसार निकाल लावण्यात आला. भारताने हा सामना २५ धावांनी जिंकल्याचा निकाल देण्यात आला.भारताची या दौऱ्यात दमदार सुरुवात झाली आहे. पहिलाच सामना त्यांनी जिंकला आहे. आता दुसऱ्या सामन्यात त्यांची कशी कामगिरी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

'सीनमध्ये मी एका मुलीची ओढणी ओढली..' शक्ती कपूर यांनी सांगितला प्रसंग

मुंबई : शक्ती कपूर यांनी अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं असून चाहत्यांच्या मनात स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. शक्ती कपूर यांनी खलनायकाच्या भूमिका साकारल्या आणि त्या गाजल्याही. मात्र, एका सिनेमातील भूमिका शक्ती कपूर यांच्या आई-वडिलांना आवडली नाही. सिनेमा सुरू असतानाच मध्येच ते सिनेमागृहाबाहेर आले. याबद्दल शक्ती कपूर यांनी एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे.शक्ती कपूर यांनी 'अल्फान्यूयॉन स्टुडिओ'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलं की, 'माझे दोन मोठे चित्रपट रिलीज झाले होते आणि त्याच काळात 'इन्सानियत के दुश्मन' हा चित्रपटही प्रदर्शित झाला होता. मी माझ्या आई-वडिलांना तो चित्रपट पाहायला सांगितलं. दोघेही थिएटरमध्ये गेले. पण चित्रपट सुरू होताच माझ्या पहिल्याच सीनमध्ये मी एका मुलीची ओढणी ओढली होती. तो सीन पाहताच माझ्या वडिलांनी आईला उठून 'बाहेर चल' असं सांगितलं. ते म्हणाले, 'हा आधी बाहेर असं वागायचा आणि आता पडद्यावरही तेच करतोय. मला हा चित्रपट पाहायचा नाही.'नंतर त्यांनी मला फोन करून चांगलंच सुनावलं. 'तू अशा भूमिका का करतोस? तू चांगल्या माणसाची भूमिका कर. हेमा मालिनी, झीनत अमान यांच्यासारख्या अभिनेत्रींबरोबर काम कर. गुंडाचे रोल का करतोस?' असं ते मला विचारायचे. मी त्यांना सांगितलं की, तुम्ही मला हा असा चेहरा दिला आहे. या चेहऱ्याकडे पाहून कोणीही मला हिरो किंवा चांगल्या माणसाची भूमिका देत नाही.' असं शक्ती कपूर यांनी पुढे सांगितलं.एका जुन्या मुलाखतीमध्ये शक्ती कपूर यांची मुलगी श्रद्धा कपूरनेही सांगितलेलं. तिला तिच्या वडिलांच्या खलनायकाच्या भूमिका आवडायच्या नाहीत. श्रद्धा कपूरने सांगितलेलं की, ती त्यांना खलनायकाच्या भूमिकेमुळे खूप ओरडायची. तिला खूप वाईट वाटायचं. पण, आईने तिला समजावलं की, हा फक्त अभिनय आहे.दरम्यान, शक्ती कपूर यांच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यांनी 'राजा बाबू', 'गुंडा', 'अंदाज अपना अपना', 'हिरो', 'इंडियन', 'हंगामा', 'आँखे', 'फुल' यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

कठीण नावांच्या ट्रेंडबद्दल स्पष्ट बोलली साक्षी

मुंबई : सोशल मीडियावर कधी काय ट्रेन्ड पाहायला मिळतील याचा अंदाज नाही. गेल्या काही महिन्यांपासून लहान बाळांच्या कठीण नावांचा ट्रेन्ड आला आहे. चिमुरड्यांच्या नामकरण सोहळ्याचे विविध व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, नवनवीन पद्धतीने नाव सांगितले जाते. कोणी थर्माकॉलच्या तलवारीवर नाव लिहून बाळाच्या नावाची घोषणा करत आहेत, तर कोणी खणाच्या लखोट्यावर नाव लिहून व्हिडिओ शेअर करत आहेत. अनेकदा इतकी कठीण नावं समोर आली आहेत की, त्यांचा उच्चार करणंही अवघड जातं. या ट्रेन्डवरुन म जेशीर मीम्स आणि रील्सही व्हायरल झाले. आता अभिनेत्री Sakshee Gandhi हिनेही गंमतशीर व्हिडिओ शेअर केला आहे.कोण होतीस तू काय झालीस तू' फेम साक्षी गांधीने शेअर केलेल्या व्हिडिओत असे म्हटले की, 'गेल्या महिनाभरात इन्स्टाग्रामवर २२ ते २५ बारशी अटेंड केली आहेत....' साक्षी म्हणाली, 'माझं नाव साक्षी, माझ्या वडिलांचं नाव महेश... ही दोन्ही नावं सहज कुठल्याही व्यक्तीला बोलता येतील. सांगायचं कारण हे आहे की, मला एक गोष्ट कळत नाहीये, जे गेल्या चार-सहा महिन्यात नव्याने आई-वडील झाले आहेत, ते ओके आहेत ना सगळे? काय चाललंय काय? तुम्ही जी ठेवताय ही काय नावं आहेत? लोकांनी त्यांना पुढे जाऊन नावं ठेवू नये, म्हणून तुम्ही आताच नावं ठेवून घेताय का?'अभिनेत्रीने पुढे

म्हटले, 'जेव्हा त्या तलवारी आता बाहेर येतात ना किंवा ते थर्माकॉल पडायला लागले ना की, मला धडकी भरते. मध्यंतरी मी ऐकलं होतं की, थर्माकॉलवर बॅन आहे. माझी नम्र विनंती आहे की, पुन्हा त्यावर बंदी आणा. आई-वडिलांना कळत नसेल, तर आजुबाजूचे लोक, कुटुंब, मित्रमैत्रिणी यांना तर कळत असेल ना? कोणीच समजूतदार नाहीये का? प्लीज असं नका करू, साधी नावं ठेवा. मला सगळ्यात आवडलेलं नाव 'धुम्रध्वजेश' होतं.'अभिनेत्रीने असे कॅप्शन दिले की, 'सॉरी पण हे बोलणं गरजेचं होतं आणि आवडतं नाव शेवटी सांगितलं आहे. तुम्ही पण सांगा नवनवीन नावं!' साक्षीने हसण्याच्या इमोजीसह ही पोस्ट शेअर केली.

अक्षय खन्नाच्या नावे झाला अनोखा रेकॉर्ड

मुंबई : अक्षय खन्ना हा शाहरुख खाननंतरचा दुसरा भारतीय अभिनेता बनला आहे ज्याचे चित्रपटाने एकाच वर्षात जगभरात २००० कोटींपेक्षा जास्त कमाई केले आहेत. हे कमालीचे यश त्याच्या दोन प्रमुख हिंदी चित्रपटांमुळे मिळाले आहे, 'छावा' आणि 'धुरंधर'... हे दोन्ही सिनेमे २०२५ वर्षातील सर्वात मोठ्या व्यावसायिक यश मिळवलेल्यांपैकी एक होते. अक्षयने या यादीत प्रभास, अल्लू अर्जुन, रणबीर कपूर, आमिर खान आणि सलमान खान सारख्या मोठ्या स्टार्सना मागे टाकले आहे.अक्षय खन्ना शाहरुख खान नंतर पहिला भारतीय अभिनेता बनला आहे ज्याच्या चित्रपटाने एकाच वर्षात २००० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे.

गोव्यातील पार्टीत तोकड्या कपड्यावर डान्स

अभिनेत्री सोनम बाजवा नेटकऱ्यांच्या निशाण्यावर

मुंबई : अभिनेत्री सोनम बाजवा नं गोव्यातील एका क्लबमध्ये डान्स केला आणि यामुळे आता वाद निर्माण झाला आहे. सोनम बाजवाच्या शॉर्ट ड्रेसमुळे पंजाबी लोक संतापले आहेत आणि सोशल मीडियावर त्यांचा राग व्यक्त करत आहेत. त्यांचा असा दावा आहे की, अभिनेत्रीनं पंजाबी लोकांच्या मिरवणुकीचं नेतृत्व केलं. सोनम बाजवा ही एक पंजाबी अभिनेत्री आहे आणि बॉलिवूडमध्येही काम करते. ती लवकरच 'बॉर्डर २' चित्रपटात दिसणार आहे. चित्रपटातील 'संदेसे आते हैं' या गाण्यातही ती दिसली. सोनमचं या गाण्याबद्दल कौतुक होत असतानाच, नवीन वर्षाच्या पार्टीत तिच्या डान्समुळे तिला वादात ओढलं आहे. रिपोर्टनुसार, एका युजरने अलीकडेच सोशल मीडियावर सोनम बाजवाच्या डान्सचा व्हिडिओ शेअर केला असून त्यानं असं म्हटलं की, ही पंजाबी संस्कृती नाही. काही युजर्सनी सोनम बाजवाच्या शॉर्ट ड्रेसवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. एकाने असंही म्हटलं की, पूर्वीच्या काळी अशी घाणेरडी गोष्ट अस्तित्वात नव्हती. सोनम बाजवा अनेकदा वादात अडकली आहे. एकदा, अभिनेत्रीला फतेहगढ साहिबमधील एका मशिदीत 'पित सियापा' या पंजाबी चित्रपटाचे शूटिंग केल्याबद्दल पंजाबचे शाही इमाम मोहम्मद उस्मान लुधियानवी यांची माफी मागावी लागली. त्यानंतर शाही इमामने घोषित केलं की, सोनम बाजवाने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. ती मशिदीत जेवली. त्यावेळी सोनमविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आणि तिच्या अटकेची मागणी करण्यात आली.सोनम बाजवाने एका चित्रपटात सिगारेट ओढल्या आणि दारू प्यायली. त्यामुळेही ती चर्चेत आलेली. २०२३ मध्ये, ख्रिश्चन धर्माशी संबंधित सोनम बाजवाचे काही जुने ट्विट व्हायरल झाले. या ट्विटपैकी एकात लिहिलं होतं, 'मी येशूला फॉलो करते पण धार्मिक ख्रिश्चन नाही.' त्यानंतर सोनमवर धार्मिक धर्मांतराचा आरोप करण्यात आला.सोनम बाजवा आता दिलजीत दोसांझसोबत 'बॉर्डर २' चित्रपटात दिसणार आहे. तिच्या भूमिकेबद्दल अधिक माहिती जाहीर केलेली नाही. अनुराग सिंग दिग्दर्शित 'बॉर्डर २' हा चित्रपट २३ जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात सनी देओल, वरुण धवन, अहान शेट्टी आणि इतर अनेक कलाकार आहेत.

मिरवण्यासाठी नव्हे काटकसरीने सरकारी वाहनाचा वापर जिल्हा माहिती अधिकाऱ्यांचा असाही साधेपणा !

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाने शासकीय वाहन वापराबाबत नवा पायंडा पाडला आहे. अनेक अधिकारी फक्त मिरवण्यासाठी सरकारी वाहनाचा वापर करत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. मात्र जिल्हा माहिती अधिकारी यात अपवाद ठरले आहे. इंधन अनुदानाची उपलब्धता आणि वाहन सुस्थितीत असतानाही प्रशासकीय काटकसर, साधेपणा आणि आर्थिक शिस्त या दृष्टिकोनातून जिल्हा माहिती अधिकारी यांनी सरकारी लवाजमा न करता ते साध्या दुचाकीने शासकीय बैठका, कार्यक्रमांना उपस्थित राहून कामकाज करताना दिसत आहेत. त्यांच्या या भूमिकेचे कौतुक होत आहे. शासनाकडून प्राप्त निधीचा योग्य, नियमबद्ध आणि गरजेपुरताच वापर व्हावा, या भूमिकेतून विद्यमान जिल्हा माहिती अधिकारी अनावश्यक फिरणे टाळत असल्याचे समजते. शासनाकडील इंधन खर्चाचा प्रत्येक रुपया हा जनतेच्या करातून येत असल्याने, ङ्गङ्घविनाकारण मिरवण्यासाठी वाहनाचा वापर न करता, अत्यावश्यक कामांसाठीच खर्च करावा,फक्त हा दृष्टिकोन त्यांनी स्वीकारल्याची चर्चा आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये इंधन व वाहन देखभाल खर्चासाठीचे अनुदान वेळेवर उपलब्ध न होण्याच्या घटना घडतात. अशा परिस्थितीत काही अधिकारी स्वतः खर्च करून नंतर देयक सादर करतात; मात्र प्रत्येक अधिकाऱ्यावर वैयक्तिक खर्च करण्याची सक्ती नसते, ही बाबही तितकीच महत्त्वाची आहे. विद्यमान जिल्हा माहिती अधिकारी यांनी गरज नसताना अनावश्यक खर्च करणे टाळणेफक्त ही भूमिका घेतली असून, यामागे आर्थिक शिस्त आणि भविष्यातील लेखापरीक्षणातील आक्षेप टाळण्याचा विचार असल्याचेही सांगितले जाते. कार्यालयीन कामासाठी कर्मचाऱ्यांच्या दुचाकीचा वापर केला जात असल्याबाबत टीका होत असली, तरी काही प्रशासकीय वर्तुळात याकडे ङ्गङ्घसाधेपणा आणि खर्चबचतफक्त म्हणूनही पाहिले जात आहे. क्लास-१ अधिकारी असूनही अनावश्यक सरकारी वाहन वापर टाळणे, ही बाब प्रशासनातील बदलत्या कार्यसंस्कृतीचे लक्षण मानले जात आहे बुलढाणा जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असला, तरी सध्या डिजिटल माध्यमे, दूरध्वनी, व्हर्च्युअल संवाद आणि स्थानिक प्रतिनिधींमार्फत प्रसिद्धीचे काम सुरू असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे वाहनाचा मर्यादित वापर म्हणजे काम पूर्णतः ठप्प आहे, असे

सरसकट म्हणणे योग्य ठरणार नाही, असेही काहींचे मत आहे. सरकार जरी गतिमान प्रशासनचा नारा देत असले, तरी गतिमानपणासोबतच आर्थिक शिस्तही तितकीच आवश्यक आहे. शासकीय वाहन, इंधन आणि देखभाल खर्चाबाबत काटेकोर भूमिका घेणे, ही बाब भविष्यात इतर अधिकाऱ्यांसाठीही एक संदेश ठरू शकते.

बुलढाणा तालुक्यातील अवसायनातील सहकारी संस्थांबाबत जाहीर सूचना...

३६ संस्थांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा तालुक्यातील विविध सहकारी संस्था दीर्घकाळापासून अवसायनात असून, त्यांच्या नोंदणी रद्द करण्याची वैधानिक प्रक्रिया सहकार विभागाकडून सुरू आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये सदर कार्यवाही करण्यात येत असून, संबंधित संस्थांचे व्यवहार अधिकृतपणे बंद करण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची पायरी आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ८९ (४) नुसार, अवसायनात असलेल्या सहकारी संस्थांविरुद्ध ज्या कोण्या व्यक्ती, संस्थांचे विरुद्ध काही दावे असतील, त्यांनी जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत आपले दावे लेखी स्वरूपात, पुराव्यासह संबंधित नोंदणी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. सहकार विभागाने स्पष्ट केले आहे की, ठराविक कालावधीत कोणताही दावा किंवा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यानंतर सादर होणाऱ्या दाव्यांची दखल घेतली जाणार नाही. तसेच अशा उशिरा दाखल होणाऱ्या दाव्यांची जबाबदारी सहकार विभाग अथवा संबंधित अवसायकावर राहणार नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार या सर्व संस्थांना अंतिम अवसायनात घेण्यात आले आहे. संबंधित संस्थांवर अवसायकाची नियुक्ती यापूर्वीच करण्यात आली असून, संस्थांची मालमत्ता, देणी-घेणी व कागदपत्रांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित वैधानिक बाबी पूर्ण झाल्यानंतर नोंदणी रद्द करण्याची अंतिम कार्यवाही केली जाणार आहे. नोंदणी रद्द होण्याच्या प्रक्रियेत बुलढाणा तालुक्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा समावेश आहे. यामध्ये जि.प. माध्य. शिक्षक व कर्मचारी सह. पत बुलडाणा र.न.२०४, सिंगगड गृहनिर्माण सह.संस्था म. बुलढाणा, सन्मित्र शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्म. सह. पतसंस्था. म. बुलडाणा ३१०, औंदुबर गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, पिपल्स अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसा.म. बुलडाणा र.न.३१, सिंधुदुर्ग गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, विवेकानंद नागरी सहकारी पत संस्था, म.बुलडाणा र.न.३२२, लो-इन. गृप गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, शिवप्रताप ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्था म. बुलडाणा, शिवाजी गृहनिर्माण सहकारी संस्था म. बुलडाणा, भाग्योदय ग्रामिण बिगर शेती सह. पत संस्था. म. देऊळघाट र.न.३३८, तिरुपती नं.१ गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, धनलक्ष्मी नागरी सहकारी पत संस्था, म.बुलडाणा र.न.३४३, माँ.जगदंबा आदिवासी उपसा जलसिंचन सह. संस्था, कामेश्वर ग्रामिण बिगर शेती सह. पत संस्था, म. वरवंड र.न.३५२, आदर्श सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था म.बुलडाणा, विदर्भ नागरी सहकारी पत संस्था, म. बुलडाणा र.न.३५८. जगदंबा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था म.बुलडाणा, जयजवान जय किसान सहकारी ग्राहक भांडार, लोक कल्याणी महिला नागरी सहकारी पत संस्था. म. बुलडाणा र.न.३६०, अहिल्या पगारदार सेवकांच्य सहकारी पतसंस्था म. बुलडाणा, महात्मा ज्योतीबा फुले ग्रामिण बिगर शेती सह. पतसंस्था म. रायपूर, प्रियदर्शनी महिला नागरी सहकारी पतसंस्था म. बुलडाणा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मा. औद्यो.सह.संस्था म. बुलडाणा, शेतकरी गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, जिजाऊ महिला ओद्यो.सह.संस्था म. बुलडाणा, राजे छत्रपती हमाल कामगार सह. संस्था म. बुलडाणा, जगदिश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न. ३५४, व्यंकटेश गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३४६., तारकेश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न.३५५, तिरुपती गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३४७, गगनगिरी गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न.३५६, व्यंकटेश १ गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३४९, स्वस्तिक शॉ ॲण्ड फ्लैट ओनर्स को. ऑप. हाऊ. सो. लि. बुलडाणा र.न.३७९, बालाजी १ गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३५, ममलेश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न.३५३ अशा एकूण ३६ सहकारी संस्था या कारवाईच्या कक्षेत आहेत. सहकार विभागामार्फत ही जाहीर सूचना अधिकृत सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधित सर्व सभासद, हितसंबंधित नागरिक, कर्जदार व ठेवीदार यांनी या सूचनेची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत दावा सादर न केल्यास भविष्यात कोणतीही तक्रार अथवा मागणी ग्राह्य धरली जाणार नाही, असेही विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मेहकर तालुक्यात १९ हजार ६१६ घरकुलांना मंजुरी; ५ हजार ८२७ घरकुल पूर्ण तर १३ हजार ७०० प्रगतीत

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील मेहकर तालुक्यामध्ये विविध आवास योजनांअंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. आतापर्यंत विविध आवास योजनेंतर्गत१९ हजार ६१६ घरकुले मंजूर असून त्यापैकी ५ हजार ८२७ घरकुले पुर्ण झालेले आहेत. उर्वरित १३ हजार ७०० घरकुल प्रगतीत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत टप्पा१ मध्ये २ हजार ७८४ व टप्पा-२ मध्ये ११ हजार २७७ अशी एकूण १४ हजार ०६१ घरकुले मंजूर असून त्यापैकी २ हजार ९४५ घरकुले पुर्ण झाले असून ११ हजार ११६ घरकुले सध्या प्रगतीपथावर आहेत. रमाई आवास योजनेअंतर्गत २ हजार ४८७ घरकुलांचे उद्दिष्ट असून त्यापैकी १ हजार ५९७ घरकुले पूर्ण झाली आहेत व ८९० घरकुले प्रगतीत आहेत. शबरी आवास योजनेअंतर्गत १ हजार ०१२ घरकुलांचे उद्दिष्ट असून ३९५ घरकुले पूर्ण झाली आहेत. ५९८ घरकुले बांधकामाच्या विविध टप्प्यात आहेत. पारधी आवास योजनेमध्ये ३२ उद्दिष्टांपैकी ३१ घरकुले पूर्ण झाली असून १ घरकुल प्रगतीत आहे. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ६१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. अशा प्रकारे मेहकर तालुक्यात विविध आवास योजनांअंतर्गत एकूण १९ हजार ६१६ घरकुले मंजूर असून त्यापैकी ५ हजार ८२७ घरकुले पूर्ण झाली आहेत, तर १३ हजार ७०० घरकुले प्रगतीत आहेत. मेहकर तालुक्यातील सर्व घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाच्या बांधकामाच्या सद्यस्थितीनुसार संबंधित ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामरोजगार सेवक यांच्याशी समन्वय साधून पुढील हप्त्याची मागणी विहित नमुन्यात नेमून दिलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता अथवा घरकुल कक्षाकडे सादर करावी. यामुळे घरकुलाचे फोटो आवास योजनेच्या संकेतस्थळावर वेळेत अपलोड होऊन हप्त्याचे वितरण विनाविलंब होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, घरकुल योजनेच्या अनुषंगाने कोणीही लाभार्थ्यांकडे पैशांची मागणी केल्यास, संबंधितांनी तात्काळ लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे सादर करावी, असे स्पष्ट आवाहन गट विकास अधिकारी, पंचायत समिती मेहकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अभिमन्यु उदगीरे यांना पीएचडी पदवी प्रदान.

वृत्तसंस्था/वाशिम

-स्थानिक राजस्थान आर्य,कला,मिठुलाल कचोलिया वाणिज्य आणि सत्यनारायण रामकृष्ण राठी विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थी अभिमन्यू अर्जुनराव उदगीरे यांना संत गाडगेबाग अमरावती विद्यापीठ,अमरावती यांच्याकडून प्राणीशास्त्र विषयात आचार्य (पीएच. डी) पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ.अभिमन्यु उदगीरे यांनी आजवर ९ शोधनिबंध नामवंत अंतरराष्ट्रिय जर्नल्समध्ये प्रकाशित केले आहेत. उदगीरे यांनी राजस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य,विज्ञान विभागाचे प्रमुख,प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख,व पीएचडी मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली मफ या विषयावर संशोधन पूर्ण केले.या संशोधनात प्रजातीतील जिवांचा अभ्यास करण्यात आला असून,गोडया पाण्यातील माशांवर होणाऱ्या प्रादुर्भावामुळे मत्यव्यवसायामध्ये होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.या अभ्यासामुळे वाशिम जिल्ह्यातील मत्यव्यवसाय क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष लाभ होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. संशोधन काळात प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर,संशोधन केंद्र प्रमुख डॉ.रचना पचोरी,प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रदीपकुमार पाटील,प्राध्यापक डॉ.शेषराव राठोड,डॉ.सचिन तायडे,डॉ.जया सोमटकर यांचे सहकार्य लाभले. आर.ए.महाविद्यालयाचे अध्यक्ष ठाकूरदास मालानी,सचिव सुधीर राठी,राजस्थान एड्युकेशनच्या माजी अध्यक्षा व विद्यमान सदस्य शिला राठी,वडील अर्जुनराव उदगीरे,आई संगीता उदगीरे,मित्र विशाल खडसे,भागवत सावके,गोपाल काटेकर,यश वाकुडकर,गोपाल आदमणे,सोमेश काटेकर यांनी त्यांचे कौतुक केले.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

गुंतवणुक रक्कम		५००	१०००	१५००	२०००	३०००	५०००
अ.क्र.	गुंतवणुक कालावधी महिने	पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम					
१	१५६	१०३४१८	२०६८३६	३१०२५४	४१३६७२	६२०५०७	१०३४१७९
२	१४४	९५५४४	१९१०८८	२८६६३३	३८२१७७	५७३२६५	९५५४४२
३	१३२	८८२६९	१७६५३८	२६४८०६	३५३०७५	५२९६१३	८८२६८८
४	१२०	८१५४४	१६३०८७	२४४६३१	३२६१७५	४८९२६२	८१५४३६
५	१०८	७५३३६	१५०६७१	२२६००७	३०१३४२	४५२०१३	७५३३५५
६	९६	६५५९६	१३९१९३	२०८७८९	२७८३८६	४१७५७९	६९५९६५

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

अ.क्र.	मुदती ठेवीचे विवरण		लागू व्याजदर	पतसंस्था व इतर संस्था
१	१५ दिवस ते ९० दिवस		६.००%	६.००%
२	९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता)		६.५०%	५.००%
३	१८१ दिवस ते १३ महिने		६.००%	६.००%
४	१४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
५	आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
६	मासिक ठेव		७.००%	–
७	बचत ठेव	अ) रू. ३ लाखांपर्यंत	३.००%	–
		ब) रू. ३ लाखांचे वर	४.५०%	–

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

वय	गुंतवणूक रक्कम	मिळणारी रक्कम
जन्माच्या वेळी	१७०००	१०३६०९
१ वर्ष	१८०००	१००६५७
२ वर्ष	१९५००	१०००५२
३ वर्ष	२१५००	१०१२१७
४ वर्ष	२३५००	१०१५०९
५ वर्ष	२५५००	१०१०६४
६ वर्ष	२७५००	१००००३
७ वर्ष	३००००	१०००९७
८ वर्ष	३३०००	१०१०२७
९ वर्ष	३६०००	१०११२२
१० वर्ष	३९०००	१००५१५

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

आंचरवाडी येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या रेट्याने नवीन डीपी बसवली

जनसंचलन/ आंचरवाडी

येथे गेल्या अनेक दिवसापासून वीज ट्रान्सफॉर्मर (डीपी) क्षमतेअभावी शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. जुन्या डीपीवर जादा भार असल्याने वारंवार वीज खंडित होणे, शेतीपंप जळणे, त्यामुळे शेतातील पिके सुखायला लागली होती शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान व्हायला सुरुवात झाली होती. या शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमोल मोरे आणी सुनील मिसाळ यांनी सातत्याने लक्ष वेधले. त्यांनी महावितरण विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. तसेच ग्रामस्थ व शेतकऱ्यांना एकत्र करून संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला होता. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या रेट्यामुळे आणि अमोल मोरे यांच्या चिकाटीच्या पाठपुराव्यामुळे अखेर आंचरवाडी येथे नवीन व क्षमतेची डीपी बसवण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांचा दीर्घकाळापासूनचा प्रश्न मार्गी लागला असून परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाला आहे. नवीन डीपी बसवल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून अमोल मोरे व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे आभार मानले आहेत. संघटना ही शेतकरी व सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी नेहमीच रस्त्यावर उतरणार असल्याचे यावेळी अमोल मोरे यांनी सांगितले. शेतात डिपी बसवताना गणेश परिहार सहित इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.